INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-Research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

October-November-December-2018

**Vol. 5 Issue 4**

**Chief Editor :**

Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**This Journal is indexed in :**

- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261
UGC Approved Journal October-November-December 2018
ISSN : 2348-7143
Vol. 5, Issue 4

# कर्जत तालुक्यातील बचत गटांच्या वित्त पूरवठयाचा अभ्यास जिल्हा– अहमदनगर

प्रा. पुंड वनदास पांडुरंग
अर्थशास्त्र विभाग,
दादा पाटील महाविद्यालय,
कर्जत,जिल्हा—अहमदनगर
मो.नं. ९७६३०७१३५०
ईमेल—pundvandas@gmail.com

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्योत्तर काळात भारताने आर्थिक विकास साध्य करण्यासाठी आर्थिक नियोजन व पंचवार्षिक योजनांचा आवलंब केला. भारताच्या विकासाच्या मार्गात अनेक अडथळे होते. वाढती लोकसंख्या, दारिद्रय, बेरोजगारी, आर्थिक विषमता, कमी उत्पादकता इ. अडथळे विकासाच्या मार्गात होते. भारताने खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण या स्वरुपाचे आर्थिक धोरण स्विकारले परंतु आर्थिक विकासाच्या मार्गात प्रमुख अडथळा दारिद्रयाचा होता. देशाच्या सर्वांगीन विकासासाठी दारिद्रयाचे निर्मूलन होणे आवश्यक होते. दारिद्रय निर्मूलनासाठी शासनाने विविध प्रकारच्या योजना राबविल्या ग्रामीण व शहरी दारिद्रय कमी करण्यासाठी स्वंयसहायता गट स्थापन करण्यात आले.

**बचत गटांचा अर्थ :**

बचत गटाला स्वयंसहायता समुह किंवा स्वयंसहायता बचत गट असे ही म्हटले जाते. स्वयंसहायता गटाला इंग्रजी मध्ये Self Help Group असे म्हणतात. स्वत:ची सहायता करणारा गट होय. गटातील सभासद आपली स्वत: थोडी थोडी बचत करताना छोटया छोटया बचतीतून कालांतराने फार मोठी बचत निर्माण होते. थेंबे थेंबे तळे साचे या म्हणी प्रमाणे लहान बचतीतून मोठी बचत निर्माण होते. लोकांना बचतीची सवय लागते. मोठी बचत निर्माण झाल्यावर ती सभासदांच्या अडचणीच्या वेळी कर्जाची गरज भागवू शकते. सभासदांना उद्योग व्यवसाय करण्यासाठी यातून वित्त भांडवल मिळू शकते. सभासदांचा आर्थिक विकास होतो. त्यांचा सामाजिक दर्जा उंचावतो. कालांतराने गटाचा विकास होवून समाजाचा विकास होतो. त्यातून देशाच्या विकासाला हातभार लावला जातो. बचत गट संकल्पने मुळेच (Micro Finance and Micro Credit) सुक्ष्म वित्त आणि सुक्ष्म पत या संकल्पना विकसित झाल्या.

**बचत गटाच्या व्याख्या:**

बचत गटाच्या कार्यानुसार, संघटन प्रकारानुसार, विविध संस्थानी स्थापन केलेल्या प्रकारानुसार बचत गटाच्या वेगवेगळया व्याख्या करता येतात. त्यातील सर्व मान्य होतील अशा दोन व्याख्या पुढे दिल्या आहेत.

१. ''ग्रामीण किंवा स्थानिक पातळीवर समविचाराचे, समवयस्क सेवाभावी वृत्तीने, एकमेकांना सहाय्य करण्याच्या दृष्टीकोनातून, समान ध्येयाने प्रेरीत होवून स्थापन झालेला समूह म्हणजे स्वंयसहाय्यता बचत गट होय''

२. ''दारिद्रय असलेल्या लोकांना त्यांच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी पत मिळणे होय'' मायक्रो क्रेडिट चहवळ.

**संशोधनाचे उद्दिष्ट** :स्वयंसहाय्यता बचत गटांना अर्थसहाय्य करणाऱ्या बँकाचा अभ्यास करणे.



Scanned with CamScanner

**संशोधन पध्दती :**

कर्जत तालुक्यातील बचत गटांना अर्थसहाय्य करणाऱ्या बँकाचा अभ्यास करण्यासाठी कर्जत तालुक्यातील विविध बँकांच्या चौदा शखांचा अभ्यास केला आहे. तसेच दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला. यामध्ये नियतकालिके, वर्तमानपत्रे, तहसिल कार्यालय, पंचायत समिती, संदर्भ ग्रंथ याद्वारे माहिती मिळविलेली आहे.

**कर्जत तालुक्यातील बचत गटांचा वित्त पुरवठा :**

कर्जत तालुक्यातील विविध बँकाच्या शाखांनी स्वयंसहाय्यता बचत गटांना केलेला वित्त पुरवठयाची माहिती पुढील प्रमाणे अभ्यासता येईल. पुढील तक्त्यात दारिद्रय रेषेखालील बीपीएल व दारिद्रय रेषेवरील एपीएल बचत गटांचा कर्ज पुरवठा दर्शविला आहे.

**तक्ता क्र. १**

**स्वयंसहायता बचत गटांना बँकेकडून कर्जवाटप**

| अ. क्र. | बँकेचे नाव | शाखा | BPL | कर्जवाटप लाख | APL | कर्जवाटप लाख |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ADCC | कर्जत | ०९ | २७.९ | ०५ | १५.५ |
| २ | BOB | अंबीजळगाव | ०४ | १२.४ | ०३ | ९.३ |
| ३ | BOB | कुळधरण | ०५ | १५.५ | ०३ | ९.३ |
| ४ | BOM | माहिजळगाव | ०३ | ९.३ | ०३ | ९.३ |
| ५ | BOM | मिरजगाव | ०४ | १२.४ | ०३ | ९.३ |
| ६ | BOM | कर्जत | ०३ | ९.३ | ०३ | ९.३ |
| ७ | CBI | चापडगाव | ०३ | ९.३ | ०३ | ९.३ |
| ८ | CBI | सिध्दटेक | ०४ | १२.४ | ०३ | ९.३ |
| ९ | DENA | कोरेगाव | ०० | ०० | ०३ | ९.३ |
| १० | SBI | कर्जत | ०२ | ६.२ | ०३ | ९.३ |
| ११ | UBI | निमगाव गांगर्डा | ०४ | १२.४ | ०५ | १५.५ |
| १२ | UBI | राशिन | ०२ | ६.२ | ०२ | ६.२ |
| १३ | UBI | कर्जत | ०४ | १२.४ | ०१ | ३.१ |
| १४ | UBI | खेड | ०१ | ३.१ | ०३ | ९.३ |
| | | | ४८ | १४८.८ | ४३ | १३३.३ |

स्त्रोत– बचत गट विभाग, पंचायत समिती, कर्जत.

वरील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे कर्जत तालुक्यातील विविध राष्ट्रीयकृत बँकांच्या व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाच्या १४ शाखांचा अभ्यास करण्यात आला आहे. या शाखांनी दारिद्रय रेषेखालील बचतगट (BPL) व दारिद्रय रेषेवरील बचत गट (APL)यांना पत पूरवठा केला आहे. या दोन प्रकारांचे विश्लेषण पुढील प्रमाणे करता येईल.

**१. दारिद्रय रेषेखालील बचत गट (BPL) :**

दारिद्रय रेषेखालील बचत गटांना केलेल्या पतपूरवठयाचा अभ्यास करताना (ADCC) अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी पतसंस्था कडून कर्जत शहरातील ०९ बचत गटांना २७.९ लाख रू. कर्ज पुरवठा केला. तसेच (BOB) बँक ऑफ बडोदाने अंबीजळगाव व कुळधरण एकूण ०९ बचत गटांना २७.९ रू. कर्ज पूरवठा केला. (BOM) बँक ऑफ महाराष्ट्र च्या शाखांनी माहिजळगाव, मिरजगाव आणि कर्ज येथील १० बचत गटांना एकूण ३१ लाख रू कर्जत पुरवठा केला. (CBI) सेंट्रल बँक ऑफ इंडिया चापडगाव व सिध्दटेक येथील शाखांनी ०७ बचत गटांना

ISSN : 2348-7143
Vol. 5, Issue 4

२१.७ लाख रूपये कर्ज पुरवठा केला. (SBI) स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कर्जत शाखेने ०२ बचत गटांना ६.२ लाख रू. कर्ज पुरवठा केला. तर (UBI)युनियन बँक ऑफ इंडियाच्या निमगांव गांगर्डा, राशिन, कर्जत, खेड येथील शाखांनी ११ बचत गटांना ३४.१ लाख रुपयांचा कर्ज पुरवठा केला. एकूण १४८.८ लाख रूपये कर्ज पुरवठा दारिद्रय रेषेखालील बचत गटांना केला आहे.

**२. दारिद्रय रेषेवरील बचतगट (APL) :**

वरील तक्त्यातील बँकांनी दारिद्रय रेषेवरील बचतगटांना कर्ज पूरवठा केला आहे. तो पुढील प्रमाणे– ADDC बँक कर्जत ०५ बचत गट कर्ज पूरवठा रू. १५.५ लाख रूपये, (BOB) बँक ऑफ बडोदा ०६ बचत गट कर्ज रू. १८.६ लाख, (BOM) बँक ऑफ महाराष्ट्र ०९ बचत गट कर्ज रूपये २७.९ लाख रूपये, (CBI) सेंट्रल बँक ऑफ इंडिया ०६ बचत गट कर्ज रूपये १८.६ लाख रूपये देना बँक ०३ बचत गट कर्ज रूपये ९.३ लाख रूपये, (SBI) स्टेट बँक ऑफ इंडिया ०३ बचत गट कर्ज रूपये ९.३ लाख रूपये, (UBI)युनियन बँक ऑफ इंडिया ११ बचत गट कर्ज रूपये ३४.१ लाख रूपये एकूण १३३.३ लाख रूपये. अशा प्रकारे दारिद्रय रेषेवरील बचत गटांना कर्ज पूरवठा करण्यात आला आहे.

**निष्कर्ष :**

विविध बँका बचत गटांना कर्ज पुरवठा करताना दिसतात कारण बचत गटांना केलेला कर्ज पूरवठा बुडत नाही. बचत गटाकडील कर्ज वसूल होते. बँकांची निष्क्रीय मालमत्ता वाढत नाही. विशेषत: महिलांचे बचत गट वेळेवर कर्जाचे हप्ते भरतात. कर्जामुळे बचत गट आर्थिक स्वावलंबी होतात. महिलांचे सबलीकरण घडून येते.

**संदर्भ :**

१. भारतातील वित्तीय बाजार आणि संस्था, डॉ. मुकूंद महाजन.
२. मुद्रा अधिकोषण आणि सार्वजनिक वित्त, प्रा. रायखेलकर, डॉ. दामाजी
३. महाराष्ट्राची वाटचाल, डॉ. अनिल करडेकर, श्री. विद्या प्रकाशन
४. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोत्रती अभियान.
५. महिला बचत गट, रविंद्र म. काटोळे, गोडवा कृषी प्रकाशन पुणे.
६. लोकसंचलीत साधन केंद्र मिरजगाव.
७. लेकसंख्या अहवाल २०११
८. स्वयंसहाय्यता महिला बचतगट पंचायत समिती, कर्जत तहसील कार्यालय, कर्जत.
९. बचत गटातुन समृध्दीकडे, रमेश बालवाड, विद्याभारतीय प्रकाशन
10- Impact of Self Help Group in Socio-Economic Development of India- Dr. A. Sundaram Valume V
11- Internet बचतगट प्रक्रिया– सत्वश्री कोतकर,
अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन.
12- Govt. Maharashtra, Ahmednagar District Gazetter, Bombay.



Scanned with CamScanner